प्रा·डॉ·सौ·विमल के· पाटील
एम्·ए·, बी·टी·, पीएच्·डी·
छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
सातारा (महाराष्ट्र)

## प्र मा ण प त्र

श्री·संभाजी यदू मगर यांनी "द·ता·भोसले यांच्या कथेतील प्रादेशिकता" ("अगं अगं म्हशी" व "पाऊस" या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने) या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली हा लघु-शोध-प्रबंध स्वतःच पूर्ण केला आहे· त्यांचे लघु शोध-प्रबंधाचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री आहे· हा लघु-शोध-प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम्·फिल· मराठीच्या पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे·

प्रा·डॉ·सौ·विमल के· पाटील
मार्गदर्शिका
छत्रपति शिवाजी महाविद्यालय,
सातारा·

स्थळ - सातारा·
दिनांक - २५।६।९८

Principal, M.K.Yadav,
Chh. Shivaji College,
Satara. (Maharashtra)

# C E R T I F I C A T E

This is to certify that Shri.Sambhaji Yadu Magar was a regular student of M.Phil.(Marathi) during the academic year 1995-96 and 1996-97. To the best of my knowledge he bears a good moral character.

Principal,
Chh. Shivaji College,
Satara.

Place : Satara.
Date : 25/6/1997

CHHATRAPATI SHIVAJI COLLEGE SATARA

## प्रतिज्ञापत्र

"द·ता·भोसले यांच्या कथेतील प्रादेशिकता" ("अगं अगं म्हशी" व "पाऊस" या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने) या विषयावरील लघु-शोध-प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्·फिल· (मराठी) या पदवी परीक्षेसाठी लिहला आहे· हा लघु-शोध-प्रबंध अथवा त्यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही व कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही· माझे संशोधन काम ही स्वतंत्र निर्मिती असून माझ्या माहितीप्रमाणे शिवाजी किंवा अन्य कोणत्याही विद्यापीठात या विषयावर प्रबंध सादर झालेला नाही·

श्री·संभाजी यदू मगर
अभ्यासक
छ·शिवाजी महाविद्यालय,
सातारा·

स्थळ : सातारा
दिनांक : २५-६-१९९७

## मनोगत आणि भूमिका

मी एक स्वैर, स्वच्छंदी परंतु संकेतबध्द समाजव्यवहार, परंपराधिष्ठित नैतिक मुल्ये नि समाजनिष्ठ जीवनमुल्ये यांना न डावलता, त्यांचा पुरस्कार करूनच आदर्शवत नि आशावादी जीवन जगण्याकडे कल असणारा या विश्वाचा एक सहप्रवासी· स्वजीवन प्रवासात जे-जे साहिले, पाहिले, अनुभवले, त्यातूनच "जीवन एक कला आहे" याचे प्रत्यंतर आले· म्हणूनच कलेत दिसणारे जीवन आणि जीवनात असणारी कला, यांचा अचूक अन्वयार्थ शोधण्याचा छंद जडत गेला· चित्रकला, साहित्यलेखन, वाचन आणि मनन यातून साहित्यविश्वाशी अधिक जवळीक आली· याहूनही मनन आणि चिंतन यातून समीक्षा क्षेत्राची विशेष आवड निर्माण झाली· विशेषत्वाने मराठी ग्रामीण साहित्यावर विशेष जीव जडला· ग्रामीण अनुभूतीतून ग्रामीण जीवनाची अस्सल स्पंदने जागृत करणा-या साहित्यकृतींनी आणि सहित्यिकांनी विशेष लक्ष वेधून घेतले· त्यांपैकीच द·ता·भोसले हेही एक होत· मीही ग्रामीण जीवनाशी आणि समाजाशी संलग्न असणारा एक घटक असल्याकारणानेही असेल कदाचित· का कुणास ठाऊक? पण आजही, ग्रामीण साहित्यच मला अधिक अंतःस्पर्शी आणि जवळचे वाटते हेच खरे· तरीही, त्यातील गुणाबरोबरच त्यातील दोषही शोधत बसण्याचा स्वभावधर्म स्वस्थ बसू देत नाही·

मराठी ग्रामीण साहित्यप्रांतात प्रादेशिकतेच्या अंगाने प्रादेशिक साहित्यकृतींचा, विशेषत्वाने कथासाहित्याचा म्हणावा तितका अभ्यास झालेलाच नाही· म्हणूनच द·ता·भोसले यांच्या "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या कथासंग्रहांतील प्रादेशिकतेवर प्रकाश टाकण्याचा यथार्थ मानस·

प्रस्तुत प्रबंधातील प्रादेशिकतेचा ओझरता तात्रिक विचार, प्रादेशिकतेच्या प्रचलीत भूमिकेला एक नवी दिशा यापेक्षाही एक रास्त अशी दिशा दाखवून देण्यास साहयभूत ठरेल यात शंका नाही· केवळ माझे ते खरे, नव्हे तर खरे ते माझे, ही भूमिका संशोधनदृष्टया महत्त्वाची ठरते· म्हणूनच, या भूमिकेला अनुलक्षूनच "ग्रामीण" आणि "प्रादेशिक" हे परस्पर सर्वस्वी भिन्न अगर सर्वस्वी एक नव्हेच· म्हणूनच ते परस्परांहून कितपत भिन्न आणि कितपत एकच ठरते? याचा चिकित्सक आणि तात्त्विक विचार प्रस्तुत प्रबंधात केला आहे·

(द·ता·भोसले यांच्या ग्रामीण समजल्या जाणा-या कथावाङ्मयात व्यापक पातळीवरचा प्रादेशिक आविष्कार साधलेला दिसतो·) तथापी त्यांचे "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" हे कथासंग्रह ग्रामीण आहेत, यापेक्षाही ते प्रादेशिक आहेत हेच अधिक नजरेत भरते· कारण त्या कथासंग्रहातील कथा या संपूर्ण सांगोला (पंढरपूर) परिसरातील प्रादेशिक जीवनमानाचे आणि लोकजीवनाचे दर्शन घडवतात· म्हणूनच त्यांच्या ग्रामीण म्हटल्या जाणा-या कथावाङ्मयाचा, प्रादेशिकतेच्या अंगाने केलेला अभ्यास उद्‌बोधक ठरण्यास प्रत्यवाय नाही·

सामाजिकतेच्या अनुषंगाने त्यांच्या कथेंत आलेले प्रादेशिक लोकमानसाचे आणि सामुहिक लोकमानसाचे चित्रण अधिक ठसठशीत आणि प्रत्ययकारी झाले आहे·

त्यांच्या कथेंतून सांगोला परिसरातील भौगोलिकता, निसर्ग, सामुहिकता सामाजिकता-बोलीभाषा व तेथील जीवननाट्य आणि समस्या ही प्रादेशिकतेची घटकतत्त्वे, प्रदेशोन्मुख होऊन आली आहेत· आणि या घटकतत्त्वांतही प्रदेशपुरस्सर वेगळीक दिसून येते· म्हणूनच त्यांचा प्रादेशिक परिसर आणि तेथील प्रादेशिकता ही इतर प्रदेशाच्या तुलनेत भिन्न ठरते· दुष्काळग्रस्त प्रदेशाची सांगता करणारा लोकसमूह त्यांच्या कथेंत भेटतो· आणि त्यातून त्यांच्या प्रदेशाचे भिन्न भौगोलिक वैशिष्टय सिध्द होत जाते· या दुष्काळग्रस्त --आणि प्रकोपी अशा प्राकृतिक परिस्थितीच्या परिणामातूनच त्यांची पात्रे कमालीची दैववादी बनलेली दिसतात· म्हणूनच त्यांची संस्कृतीसुध्दा प्रमाणापेक्षा जास्तच, आदिमतेकडं झुकलेली दिसते· न पावणा-या

देवावर, न पावणा-या निसर्गावर श्रध्दा अगर विश्वास ठेवणारी त्यांची पात्रे कमालीची श्रध्दाळू तितकीच हतबल वाटतात· देवावर ठेवलेल्या विश्वासाला तडा गेला तरी याचा दोष ती देवाला देत नाहीत। तर आपल्या दैवाला आणि नशीबालाच ती दोष देतात· त्यांच्या कथेतील पात्रांना तथा माणसांना, माणूसपणच मिळत नाही· त्यामुळेच माणसातलं माणूसपण शोधण्यापेवजी दगडातलं देवपण शोधणारी सामाजिकता त्यांच्या कथेत डोकावते· तेथील माणसांप्रमाणेच तेथील सामाजिकता आणि सारेच प्रादेशिक घटकही दरिद्री असल्याचे दिसून येते· तेथील माणूसच नव्हे तर, तेथील देव आणि प्राकृतिकताही म्हणजेच तेथील निसर्गही हतबल असल्याचे दिसून येतात·

दुष्काळी प्रदेशात भूक भागवणं, जीव जगवणं हीच फार मोठी समस्या ठरते· त्यामुळेच "दोन घास मिळवणे" हीच फार मोठी अपेक्षा· परंतु ही साधी अपेक्षाही सहजासहजी पूर्ण होत नाही· त्यातूनच अन्न हे सर्वस्व आणि भूक ही शाप असल्याची करूणगर्भ जाण त्या प्रदेशजीवनाला चिकटलेली दिसते· दुःख, दैन्य, दारिद्रय, असहायता, आणि दुर्बलता यातून निर्माण होणारे कारूण्याचे दाट सावट, आपली गडद सावली त्या प्रदेशजीवनावर पसरविताना दिसते· विशिष्ट परिस्थितीशी आणि प्रदेशाशी बांधले गेल्याने वाटयाला येणारी उपासमार, हालअपेष्टा आणि उपेक्षा, इत्यादींतून निर्माण होणारी दारिद्रयाची भीषणता, दुःखाची तीव्रता आणि वेदनेचा थरार - हे सारे प्रदेशपुरस्सर भिन्न ठरते·

प्रदेशसापेक्ष सामाजिकतेप्रमाणेच तेथील बोलीभाषेबरोबरच, लेखकाच्या कलात्मक निवेदनातून प्रादेशिक पात्रांच्या अंतःस्पर्शी जीवंत स्पंदनांना आणि भावनिक आंदोलनांना अधिक सूचकता प्राप्त झाली आहे, आणि प्रादेशिक वेगळेपणही·

प्रस्तुत प्रबंधात द·ता·भोसले यांच्या "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या दोन कथासंग्रहाच्या अनुषंगाने केलेल्या प्रादेशिकतेच्या अभ्यासामुळे, ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्याच्या अभ्यासकांचा, समीक्षकांचा व जिज्ञासू रसिक-वाचकांचा प्रादेशिकते बाबतचा पूर्वग्रहदूषीत दृष्टीकोन निश्चितपणे निवळू शकेल, असा आशावाद वाटतो· सदर प्रबंधातील प्रादेशिकतेचा विचार हे मराठीच्या अभ्यास क्षेत्रातील अल्पसे योगदान

ठरले तरी, जीवनाच्या अनेक आघाडयांवर झुंज देता-देता घेतलेले परिश्रम, सार्थकी लागल्याचे समाधान· ते तसे मौलिक योगदान ठरावे यासाठी ज्यांनी-ज्यांनी आटोकाट प्रयत्न केला, त्यांमध्ये माझ्या मार्गदर्शिका प्रा·डॉ·सौ·व्ही·के·पाटील ‖मॅडम‖ यांचा वाटा महत्त्वाचा आहे·त्याचप्रमाणे - प्रा·डॉ·सौ·हेमलता गायकवाड, प्रा·डॉ·श्री·शिवाजीराव पाटील, प्रा·डॉ·सौ·नलिनी महाडिक, प्रा·डॉ·सौ·शुभांगी भूतकर, माननीय प्राचार्य श्री·मा·के· यादव ‖छ·शिवाजी कॉलेज, सातारा‖, प्रा·श्री·पी·एम्·काटकर ‖डी·जी·कॉलेज, सातारा‖, प्रा·श्री·आर·पी·पोळ, प्रा·श्री·मेनकुदळे ‖महिला कॉलेज, सातारा‖ यांनीही वेळोवेळी मौलिक मार्गदर्शन केले·

ऐन कर्तृत्वाच्या उंबरठयावर बेकारीनं ग्रासलेल्या खिन्न मनात, आयुष्याच्या टाकाऊपणाची "विचित्र" जाण तीव्र होण्यापूर्वीच ज्यांनी मला संशोधन कार्यात गुंतवून वाया जाऊ पाहणा-या क्षुद्र क्षणांचे मोल करण्याची प्रेरणा दिली· त्या माझ्या कुटुंबियांचा नि नातलगांचा मी अविरत ऋणी आहे·

खरे तर विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे डॉ·सुचेता देशमुख व मंजुषा कुलकर्णी यांच्या अमोघ सहकार्याचा उल्लेख व त्यांचे मनःपूर्वक आभार, त्यांनी संशोधन दृष्टया अत्यंत उपयुक्त अशी नियतकालिके, साप्ताहिके, त्रैमासिके, संशोधन पत्रिका, साहित्य पत्रिका व अनेक संदर्भ पुस्तके, व्यक्तिगतरित्या उपलब्ध करुन देऊन माझ्या संशोधन कार्याला अमूल्य हातभार लावला· डॉ·सुचेता देखमुख, प्रा·कु·सत्वशीला जाधव, डॉ·द·ता·भोसले, डॉ·शिवाजीराव पाटील, डॉ·शिवाजीराव चव्हाण आणि मंजुषा कुलकर्णी यांच्याशी झालेल्या वाङ्मयीन चर्चा संशोधनदृष्टया अत्यंत उपकारक ठरल्या· या सर्वांच्या आत्मिक आणि अलोट सहकार्याबद्दल "आभार" हा शब्दही अप्रस्तुत ठरावा· आणि तो त्यांना रूचणारही नाही· तरीपण त्यांच्या आभाराऐवजी, त्यांच्या आत्मिक जिव्हाळ्याला आणि अलौकिक बुध्दिमत्तेला माझे स्नेहपूर्ण अभिवादन·

छ·शिवाजी कॉलेजच्या "शिवाजी ग्रंथालयाचे ग्रंथपाल प्रा·श्री·बी·एस·गायकवाड ‖सर‖, श्री·एस·एस·पावसकर, श्री·पी·आय·खान, सौ·सुमन निकम आणि श्री·बी·एल·सावंत, श्री·एस्·एम्·सणस व श्री·एम्·जे·मोरे इत्यादी ग्रंथालयीन

आणि प्रशासकीय सेवकांनी अनमोल सहकार्य केले· तसेच सातारा येथील महिला कॉलेज, डी·जी·कॉलेज, आझाद बी·एड्·कॉलेज, महाराजा सयाजीराव विद्यालय, सातारा आणि डी·पी·भोसले कॉलेज, कोरेगांव, दहिवडी कॉलेज, दहिवडी, व कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज पंढरपूर इत्यादी ग्रंथालयांचे सहकार्य झाले· येथून ग्रंथ व पुस्तके उपलब्ध करून देणा-या सर्व संबंधित प्राध्यापकांचे, शिक्षकांचे आणि त्या सर्व ग्रंथालय प्रमुखांचे व सेवकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो·

शिवाजी विद्यापीठाच्या "बी·यु·टी·आर" विभागाचे अधिकारी श्री·मारूलकर (सर) व गोनुगडे (सर) आणि इतर संबंधित अधिका-यांनी माझ्या प्रबंधाच्या चुकीच्या शीर्षकातील दुरूस्तीत व अपेक्षीत विषय बदलात तातडीने लक्ष घालून,माझ्या संशोधन कार्यातील अडथळा दूर केला· त्या सर्वांनी मला संशोधन कार्यात जे बहुमोल सहकार्य केले, त्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार·

या प्रबंधाचे टंकलेखन व बांधणी अत्यंत तत्परतेने व सुव्यवस्थीतपणे करून देणारे "रिलॅक्स सायक्लोस्टाईलिंग, सातारा" चे श्री·मुकुंद ढवळे आणि त्यांचे सहकारी श्री·राजू कुलकर्णी व श्री·सुशीलकुमार कांबळे यांचाही मी अत्यंत आभारी आहे·

माझ्या संशोधन कार्याला उत्तेजन देणा-या आणि त्याबाबत सुयश चिंतणा-या माझ्या सर्व हितचिंतकांचे, गुरूवर्यांचे व मित्रांचे मी मनःपूर्वक आभार मानतो·

श्री·संभाजी यदू मगर

छ·शिवाजी महाविद्यालय, सातारा·

## अनुक्रमणिका


प्रकरण पहिले 1 ते 32

मराठी कथावाङ्मय : उदय - वाटचाल व विकास·

अ· एकूण कथावाङ्मयाच्या अनुषंगाने : (एक ते सहा टप्पे)

1· उदय ते इ·स·1800 -
श्री·श्रोत्रिय, विष्णुशर्मा ते संत एकनाथ - पंडित मुक्तेश्वर ते मोरोपंत·

2· इ·स·1800 ते 1885 -
कृष्णशास्त्री चिपळूणकर, सदाशिव काशिनाथ छत्रे·

3· इ·स·1885 ते 1925 -
ह·ना·आपटे, वि·सी·गुर्जर, कृ·के गोखले ना·ह·आपटे, सरस्वतीकुमार, श्री·कृ·कोल्हटकर, न·चि·केळकर, शि·म·परांजपे, दिवाकर कृष्ण इत्यादी·

4· इ·स·1925 ते 1945 -
वि·स·खांडेकर, ना·सी·फडके, मामा वरेरकर, साने गुरूजी, अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, वामन चोरघडे, य·गो·जोशी इत्यादी·

5· इ·स·1945 ते 1960 -
गंगाधार गाडगीळ, अरविंद गोखले, पु·भा·भावे, व्यंकटेश माडगूळकर, शांताराम, दि·बा·मोकाशी, श्री·ज·जोशी, हमीद दलवाई इत्यादी·

6· इ·स·1960 नंतरची कथा -
दिलीप चित्रे, चि·त्र्यं·खानोलकर, कमल देसाई, विद्याधर पुंडलिक, शरश्चंद्र चिरमुले, श्री·दा·पानवलकर, विजया राजाध्यक्ष, जयवंत दळवी, आनंद जातेगांवकर, ए·वि·जोशी, सुधा नरवणे, अनिल डांगे इ·

ब·　　ग्रामीण कथावाड्मयाच्या अनुषंगाने : (एक ते चार टप्पे)

1· इ·स·1925 ते 1941 -
वि·स·सुखठणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, जयवंतराव सरदेसाई,
वि·ल·बर्वे, कंटक, पै·, बा·द·सातोस्कर, रघुवीर सामंत·

2· इ·स·1941 ते 1946 -
श्री·म·माटे, ग·ल·ठोकळ, र·वा·दिघे, वामन चोरघडे,
द·र·कवठेकर, म·भा·भोसले·

3· इ·स·1946 ते 1960 -
व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द·मा·मिरासदार, रणजीत
देसाई, रा·रं·बोराडे, आण्णाभाऊ साठे, महादेव शास्त्री
इत्यादी·

4· इ·स·1960 ते द·ता·भोसलेपर्यंत -
आनंद यादव ते द·ता·भोसले·

प्रकरण दुसरे　　33 ते 47

प्रादेशिकतेचा वाड्मयीन विचार

1· प्रादेशिकतेचा प्राथमिक विचार·
2· ग्रामीण साहित्यातील ग्रामीण व प्रादेशिकतेचा साम्य-भेद विचार·
3· प्रादेशिकता म्हणजे काय?

प्रकरण तिसरे　　48 ते 63

प्रादेशिकतेचा वाड्मयीन शोध

1· प्रादेशिकतेबद्दलची विविध मते·
2· प्रादेशिकतेमुळे साहित्याला लाभणारा वेगळेपणा·
3· प्रादेशिकतेचा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणाम·
4· ग्रामीण साहित्यातील प्रादेशिकता हे वाड्मयीन मुल्य होऊ शकेल का?

**प्रकरण चौथे** 64 ते 73

**द·ता·भोसले यांचा परिचय व त्यांच्या कथालेखनाची वैशिष्टये·**

1· द·ता·भोसले यांचा परिचय·

2· द·ता·भोसले यांचे वाङ्मयीन कर्तृत्व·

3· ग्रामीण कथाकार म्हणून द·ता·भोसले यांचे स्थान·

4· द·ता·भोसले यांच्या कथालेखनाची वैशिष्टये·

**प्रकरण पांचवे** 74 ते 115

**द·ता·भोसले यांच्या "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने त्यांच्या कथेतील प्रादेशिकतेचा अभ्यास·**

1· "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या प्रादेशिक कथासंग्रहातील कथांचे आशय-विषय दृष्टया विभाजन व कथासार चर्चा·

2· द·ता·भोसले यांच्या कथेतील प्रादेशिकतेचे स्वरूप·

3· प्रादेशिकतेमुळे द·ता·भोसले यांच्या कथासाहित्याला लाभणारे वेगळेपण·

4· द·ता·भोसले यांच्या कथासाहित्यातील गुण-दोष चर्चा·

**प्रकरण सहावे** 116 ते 123

**निष्कर्ष·**

**प्रकरण सातवे** 124 ते 133

**उपसंहार·**

**परिशिष्ट** 134 ते 139

द·ता·भोसले यांची मुलाखत·

**संदर्भ ग्रंथ सूची** 140 ते 142